॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत बी.एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स या चार वर्षांच्या उद्योगाभिमुख पदवी अभ्यासक्रमासाठी १६ जून २०२६ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इलेक्ट्रॉनिक सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांना आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील कौशल्याधारित शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथम तीन वर्षे यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाची नियमित बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) पदवी प्रदान केली जाते. त्यानंतर चौथ्या वर्षात उद्योगक्षेत्रातील अप्रेंटिसशिप (उद्योग प्रशिक्षण) पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना बी.एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स पदवी मिळते. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळण्यासोबतच मासिक मानधनाची संधीही उपलब्ध होते.विद्यार्थ्यांना इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स मध्ये मेजर तसेच सोलर फोटो होलटाईक किंवा डेटा सायन्स या विषयांपैकी मायनर निवडण्याची सुविधा या अभ्यासक्रमात उपलब्ध आहे. याशिवाय शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणाच्या संधी आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम विशेष उपयुक्त ठरणार आहे.बारावी विज्ञान, डिप्लोमा, आयटीआय किंवा एम.सी.व्ही.सी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम उज्वल करिअर घडविण्याची सुवर्णसंधी असल्याचे विद्यापीठाने म्हटले आहे. "तीन वर्षांत बी.एस्सी. पदवी आणि चौथ्या वर्षात उद्योग प्रशिक्षणासह बी.एस्सी. (ऑनर्स) पदवी" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे.अभ्यासक्रमासंदर्भातील अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील यूजी/पीजी प्रवेश २०२६-२७ विभागात उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरित नोंदणी करून प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन भौतिकशास्त्र प्रशाळेच्या संचालकांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. २४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे एम.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या विविध अभ्यासक्रमाच्या विषयांसाठी प्रवेश घेण्याची प्रक्रीया सुरु झालेली आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या नोंदणीसाठी गुरूवार,दि. २५ जून, २०२६ पर्यंत अंतीम मुदत देण्यात आलेली आहे.

ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अजूनपर्यंत प्रवेशाची नोंदणी केली नसेल अशा विद्यार्थ्यांनी त्वरीत नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी www.nmu.ac.in विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **ॲडमिशन** २०२६-२७ माहिती मिळेल. तेव्हा पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी त्वरीत नोंदणी करून आपला प्रवेश निश्चीत करावा असे आवाहन एम.एस्सी. प्रवेश समितीचे समन्वयक यांनी कळविले आहे.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २४ जून, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता